(A High Impact Factor, Quarterly, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)

NAVJYOT / Vol. XII / Issue – I ISSN 2277-8063

# महात्मा गांधी यांचे आर्थिक विचार

**सुरज पांडुरंग वडर**
संशोधक विदयार्थी, राज्यशास्त्र विभाग, शिवाजी विदयापीठ कोल्हापुर
इमेल आयडी surajvadar95@gmail.com मो. क्र. ९६७३८९९६४७

**सारांश :-**
मोहनदास करमचंद गांधी हे सहजासहजी न सुटणारे कोडे आहे. त्यांना समजुन घेण्याचा प्रयत्न करण्यासाठी प्रत्येकाने भिन्न भिन्न नजरेतुन पाहिहला तर त्यांचा एखादा पैलु लक्षात घेता येईल आपण प्रस्तुत शोध निबंधात गांधीजींचे आर्थिक विकासामध्ये वैयक्तिक आणि सामाजिक मुल्ये विकसीत करण्यावर भर दिला आहे. आजच्याप्रमाणे देखील स्वातं यावपुर्वी ग्रामीण अर्थव्यवस्था महत्वाची मानली जात होती. त्याच अनुषंगाने 'खेडयाकडे चला' असा मोठा संदेश दिला होता. महात्मा गांधीनी स्वावलंबी जीवनासाठी आर्थिक स्वावलंबावर प्रभाव टाकला आहे. सदर शोधनिबंध महात्मा गांधींचे आर्थिक विचार यावर संदर्भासहित प्रकाश टाकला जातो. शोधनिबंधाचे सर्व लेखन स्वहस्तलिखित व अस्सल आहे.

**प्रमुख शोधशब्द:-** समाजवादी औदयोगिककरण, समानता, दाद्रियता, आर्थिक नैतिकता, भांडवलशाही, कुटीरउदयोग,

**प्रस्तावना :-** स्वातं यापुर्वीच्या काळात जवळजवळ सर्व तात्कालीक भारतीय विचारवंतानी आर्थिक विचारांचा उहापोह केला होता. गोपाळ कृष्ण गोखले, दादाभाई नौरोजी, न्यायमुर्ती रानडे यांनी ब्रिटीशांनी कसे शोषण (आर्थिक) केले हे सप्रमाण मांडले, पण महात्मा गांधीचे आर्थिक विचार जे मांडले ते पुर्णपणे व्यक्ती आणि समाज यांच्या विकास संदर्भात व्यक्त केले आहे. जोपर्यत समाज आर्थिक दृष्टिकोनातून स्वयंपूर्ण होत नाहीत तोपर्यंत समाजातील समस्या आणि आर्थिक विकासातील अडथळे उभे राहणार. त्यामुळे महात्मा गांधीनी राजकीय साधानाव्दारे सामाजिक आणि राजकीय विचारासोबत आर्थिक विचारांना महत्व दिले आहे. सदर शोधनिबंध हा महात्मा गांधी यांचे आर्थि विचारांवर प्रकाश टाकणारा आहे. स्वातं यपूर्व आणि स्वातं-योत्तर काळात ग्राममीण विकास आणि आर्थिक विचार यासंदर्भात गांधीजीची भुमिका योगदान दृष्टिकोन यांवर चचा करणारा आहे.

**मुख्य संशोधन व त्यांचे उपप्रश्न :**या शोधनिबंधामध्ये महात्मा गांधीजीचे आर्थिक विचार हा मुख्य संशोधन प्रश्न अन त्यांचे उपप्रश्न पुढिलप्रमाणे

१ आर्थिक समानता

२ समाजवादी समाज

३ परस्पर सहयोग

४ संसाधनांचा समान वितरण

५ बेरोजगारी, आर्थिक शोषण, सामाजिक आर्थिक मागासलेपणा यावर उपाय वरीलप्रमाणे उपप्रश्न सांगता येतात.

**संशोधन पध्दत:** सदर शोधनिबंधाच्या कार्यासाठी ऐतिहासिक संशोधन पदधती (ग्रंथ, चरित्र, पुस्तक, आत्मचरित्र) यांचा आधार घेण्यात आला आहे.

**आधार सामग्री प्राप्तीचे साधन :-** सदर शोधनिबंधाच्या लेखनासाठी ग्रंथ, आत्मचरित्र, चरित्रे, मासिक, वृत्तपत्रावील लेखांचा उपयोग करण्यात आला आहे.

**विश्लेषण :-** भारताचे राष्ट्रपिता महात्मा गांधी यांचा सविस्तर जीवनक्रम जन्म : २ ऑक्टोबर १८६९ पोरबंदर, गुजरात मुळ नाव:- मोहनदास करमचंद गांधी मृत्यु :- ३० जानेवारी १९४८ नवी दिल्ली

**१) भांडवलशाहीला विरोध :-** गांधीजीनी भांडवलशाहीला विराध करून समाजवादी अर्थव्यवस्थेचा पुरस्कार केला होता. भांडवलशाही व्यवस्थेमुहे नफेखोरी वाढुन आर्थिक विषमता, बेकारी निर्माण होते. शोषण प्रवृत्ती वाढते, उत्पादन वितरण यामध्ये एकाधिकारशाही वाढते. त्याची परिणीती गरीबांच्या आर्थिक शोषणात होते.

**२ ) औदयोगिकीकरण विशेष:-** महात्मा गांधीनी मोठया यंत्राना मानवजातीसाठी शाप मानले आहे. त्यामुळे समाजात व्देष, जीवघेणी स्पर्धा आणि स्वार्थ वाढतो. त्यामुळे मनुष्य जातीची शारिरिक व नैतिक नुकसान होते. अल्पसंख्य व्यक्तिकडे संपत्तीचा साठी होउन अल्पसंख्य लोकांचे शोषण होते.

३) कुटीरदउयोगाचे समर्थन गावांना स्वालंबन आणि स्वयंपुर्ण बनविण्यासाठी कुटीरउदयोग महत्वाचे आहेत. ब्रिटीशांच्या स्वार्थी धोरणामुळे देशी उदयोगधंदयांचा नाश झाले आहे. त्यामुळे जोपर्यंत राजकिय आणि सामाजिक जागृती येत नाही तोपर्यंत कुटीरउदयोगांना प्रोत्साहन देता येणार नाही.

**४) परस्पर सहकार्य :-** जोपर्यंत कामगार आणि भांडवलदार परस्पर सहकार्य करत नाह तोपर्यंत आर्थिक विकास अशक्य आहे.

**५ उत्पादन वितरण :-** उत्पादनाचे वितरण समान पातळीवर झाले पाहिजे त्यासाठी त्यांना साामजिक संरक्षण दिले पाहिजे.

निष्कर्ष:-

१. महात्मा गांधीजींनी मांडलेली आर्थिक विचार हे नैतिक व सामाजिक आहेत.

२. महात्मा गांधीजीचे आर्थिक विचार सामाजिक आणि माणसाचे हित साधणारे आहे.

३. महात्मा गांधीजींचे आर्थिक विचारातील कुटीरउदयोगाचे महत्त्व आजही भारतीय अर्थशास्त्रात महत्त्वाचा आहे.

४. महात्मा गांधीजींचे विचार वास्तववादी आणि व्यवहार यावर आधारित आहेत. ५. थोडयाफार प्रमाणात गांधीजीच्या आर्थिक विचारांवर भारतीय अर्थव्यवस्था मार्गक्रमण करत आहे.

संदर्भ :

१. माझे सत्याचे प्रयोग - महात्मा गांधी
२. गांधीविषयी खंड - १, २ अशोक चौसाळकर
३. हिंद स्वराज- महात्मा गांधी
४. ग्रामीण स्वराज महात्मा गांधी